सरकार भ्रमिष्टासारखे वागते
तेव्हा ते नैसर्गिकच असते.

उदाहरणार्थ,

सरकार शाळांमधून अन्न शिजवून देते,
मुलींच्या हजेरीसाठी रूपया रूपया वाटते
मुलांना जेवण मिळते पण शिक्षण मिळत नाही.
मुलींना रूपये मिळतात, पण शिक्षण मिळत नाही!

सरकार भ्रमिष्टासारखे वागते
म्हणून आपणच शाळा चालवते.

उदाहरणार्थ,

सरकार शिक्षकांना नियमित पगार देते
पण त्यांच्या शाळेत शिकवले नाही तरी चालते.
सरकारी शाळेत शिक्षण नसले तरी चालते
खेड्यातील मुलांना तिथेच जायची सक्ती मात्र करते!

सरकार भ्रमिष्टासारखे वागते
म्हणून खाजगी शाळा बंद ही करते.

उदाहरणार्थ,

कित्येक वर्षे चालताहेत खाजगी मराठी शाळा
मुले तिकडेच जातात,
पालक पैसेही पुरवतात पण,
सरकारला चांगले करता येत नाही
आणि दुसऱ्याचे चांगले चालतही नाही!